प्रेषितांच्या सलामती असो त्यांच्यावर कुरआन पठणा बद्दल विचारण्यात आले

हजरत ईब्ने अबि मुलीका रहमहुल्लाह कथन करतात की: प्रेषितांच्या सलामती असो त्यांच्यावर अनेक पत्नीं पैकी एकीला अबू आमीर म्हणतात की: नाफेअ चा अंदाज आहे की
त्या हजरत हफ्सा अल्लाह राजी असो त्यांच्याशी होत्या- प्रेषितांच्या सलामती असो त्यांच्यावर कुरआन पठणा बद्दल विचारण्यात आले, त्यांनी सांगितले की:तुमची ताकत नाही तसे पठण करण्याची, लोकांनी नम्रतेने प्रश्न केला की: आम्हाला त्याबाबत सविस्तर सांगा. कथन करणारे सांगतात की:नंतर त्यांनी पठण केले, ज्यामध्ये थांबुन थांबुन
वाचले, अबू आमीर सांगतात की:नाफेअ म्हणाले:इब्ने अबी मुलीका रहमहुल्लाह नी आमच्या
समोर कुरआन पठण करुन दाखविले, {अलहम्दुलील्लाह रब्बिल आलमीन} [अल फातिहा:१], उदगारले
व थांबले, नंतर{अर्रहमान निर्रहिम}[अल फातिहा:२] उच्चारले आणी थांबले, {मालीकी यौमीद्दिन} उच्चारले.
[صحيح] [رواه أحمد]

ईमानधारकांची आई माँ हफसा अल्लाह राजी असो त्यांच्याशी विचारण्यात आले की: प्रेषित अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर कुरआन कशा पद्धतीने पठण करत होते? त्यांनी उत्तर दिले की: तुम्ही त्यांच्या प्रमाणे पठण करु शकत नाही, जेव्हा त्यांना विनवणी केली गेली की:आम्हाला वर्णन करा. नाफेअ म्हणले की तेव्हा ईब्ने अबी मुलैका रहमहुल्लाह नी थांबुन थांबुन पठण केले;जेणेकरुन प्रेषितांची अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर पठणाची पद्धत फार जवळुन व बारकाईने समजावी, प्रेषित अल्लाह ची सलामती असो त्यांच्यावर प्रत्येक आयत वर थांबा घेत होते, शांती व समाधानाने कुरआन चे (वाचन) पठण करीत असत, उदाहरणार्थ: {अलहम्दुलील्लाह रब्बिल आलमीन} उदगारले व थांबले, नंतर{अर्रहमान निर्रहिम} उच्चारले आणी थांबले, {मालीकी यौमीद्दिन} उच्चारले.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/65247